'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue – 266 (F): Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
May- 2021

# भारतात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण

**मुग्धा मनिष राजनकर**
एम. एस. डब्ल्यू., एम. लिब., सेट (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र)
सहाय्यक प्राध्यापक
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
कमला नेहरु महाविद्यालय, नागपूर
Mobile No. 9423688848
mugdharajankar@gmail.com

**सारांश –**

प्रस्तुत संशोधन कार्यात भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. या सोबतच वर्तमान काळात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या अभ्यासक्रमात विविध विद्यापिठात जो बदल झालेला आहे त्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**मुख्य विषय–** भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण,

**प्रस्तावना :**

भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणाचा पूर्वीपासूनचा आढावा घेतला असता आपणास बरेच बदल झालेले दिसून येईल. आज फक्त ग्रंथालयात पुस्तकांची रितसर मांडणी करणे एवढेच काम नाही आहे तर आजच्या माहिती युगात माहिती तंत्रज्ञानाला मिळालेले अनन्य साधारण महत्व लक्षात घेता शिक्षणामध्ये सुध्दा माहिती तंत्रज्ञानाचा शिरकाव झालेला आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांना ग्रंथालय व्यवस्थापनाचे काम अभ्यासक्रमाच्या माध्यमातुन समजावून सांगितले जाते त्याचबरोबर ग्रंथालय भेटीच्या माध्यमातून इतरही ग्रंथालयाचे विविध प्रकार, ग्रंथालयाचे कामकाज, तज्ञ व्यक्तीसोबत भेटी, ग्रंथालयात वापरल्या जाणा-या विविध माहिती तंत्रज्ञान युक्त सोयी सवलती, ग्रंथालय व्यवस्थापनात वापरण्यात येणा-या विविध आज्ञावली व त्यांचे उपयोजन अश्या अनेक बाबींचा समावेश असल्यामुळे ग्रंथालय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामधील नवनविन प्रचलीत माहिती मिळविणे शक्य होते ज्याच्या उपयोगाने ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणात मोलाची कामगिरी बजावण्यास सक्षम होवून एक यशस्वी ग्रंथपाल होवू शकतो, त्याचप्रमाणे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण क्षेत्रात देखिल मोलाची कामगिरी बजावू शकतो.

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा**

भारतामध्ये सर्वप्रथम डब्ल्यू. ऐ. बोर्डन यांनी १९११ ते १९१२ च्या काळात प्रथम ग्रंथालय बाबत शिक्षण देण्याच्या उद्देशाने एक ओपचारिक प्रशिक्षण सुरु केले आणि डिक्सन यांनी पंजाब विद्यापिठात १९१५ मध्ये प्रशिक्षण देण्याचे काम सुरु केले, त्याचप्रमाणे १९७७ मध्ये भारतात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमात M.Phil पदवी देणारे भारतातील पंजाब विद्यापिठ प्रथम मानकरी ठरले.

**तक्ता क्रं. १ - भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणाचा ऐतीहासिक आढावा**

| अनु. क्र. | ग्रंथालय संघ / विद्यापिठ | वर्ष | प्रशिक्षण |
|---|---|---|---|
| १ | मद्रास ग्रंथालय संघ | १९२९ | प्रमाणपत्र अभ्यासक्रम |
| २ | बंगाल ग्रंथालय संघ | १९३५ | प्रमाणपत्र अभ्यासक्रम |
| ३ | आध्रं विद्यापिठ | १९३५ | बी.लिब. अभ्यासक्रम |
| ४ | मद्रास विद्यापिठ | १९३७ | बी.लिब. कोर्स |
| ५ | बनारस हिन्दु विद्यापिठ | १९४१ | बी.लिब. कोर्स |



'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue – 266 (F): Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
May- 2021

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | दिल्ली विद्यापिठ | १९४७ | बी.लिब. कोर्स |